**<u>ठळक बातम्या</u>**

- दुहेरी कर आकारणी टाळण्यासाठी भारत आणि फ्रान्समध्ये करार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्यात मुंबईत चर्चा

- डीपफेकच्या समस्येवर तोडगा काढण्याची गरज केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून व्यक्त

- अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**आणि**

- तारीक रहमान यांनी घेतली बांग्लादेशाच्या प्रधानमंत्री पदाची शपथ

**<><><><><>**

दोन्ही देशाते नागरिक आणि कंपन्यांना दुहेरी कर द्यावा लागू नये यासाठी करार करण्याचा निर्णय भारत आणि फ्रान्स यांनी घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्यासोबत मुंबईतल्या राजभवनात द्विपक्षीय चर्चेनंतर ही माहिती दिली.

**होल्ड - नरेंद्र मोदी**

आरोग्य, डिजिटल तंत्रज्ञान, विमान उद्योग यासारख्या क्षेत्रात संयुक्त उपक्रमही दोन्ही देश राबवणार आहे. दोन्ही नेत्यांनी यावेळी कर्नाटकातल्या हेलिकॉप्टर कारखान्याचं उद्घाटन केलं. फ्रान्सकडची तज्ञता आणि भारताकडचं कौशल्य एकत्र आल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड - नरेंद्र मोदी**

फ्रान्स हा भारताच्या जुन्या मित्रांपैकी एक आहे. आता दोन्ही देशांचे संबंध Special global Strategic partnership पातळीवर नेल्याची घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली. फ्रान्समध्ये स्वामी विवेकानंद कल्चरल सेंटर सुरू करण्याची घोषणा त्यांनी केली. जागतिक स्थिरता आणि वैश्विक समृद्धीसाठी एकत्रितरित्या काम करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी मॅक्राँ यांना केलं. जगभरात विविध ठिकाणी असलेल्या संघर्षांवर शांततापूर्ण पद्धतीने तोडगा निघावा यासाठी दोन्ही देश कटीबद्ध आहेत. तसंच जागतिक आव्हानांवर तोडगा काढण्यासाठी जागतिक संघटनांमध्ये बदल करण्याची गरज प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

बहुतांश बाबतीत दोन्ही देशांचे विचार जुळतात आणि हे दोन्ही देशांच्या संबंधांना तेजी देणार वर्ष असल्याचं मॅक्राँ यावेळी म्हणाले. आतंकवादाविरोधातली लढाई कायम ठेवण्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला आणि मुक्त व्यापार कराराची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

या चर्चेपूर्वी मॅक्राँ यांनी २६/११ च्या मुंबई हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली.

**<><><><><>**

भारत आणि फ्रान्स यांच्यात आज विविध विषयांवर सामंजस्य करार झाले. याअंतर्गत दोन्ही देशांमधल्या भागिदारीचा आणि संबंधांच्या २०४७ पर्यंत आराखड्याचा आढावा दोन्ही देशांचे परराष्ट्रमंत्री दरवर्षी घेणार आहेत. दोन्ही देशांमध्ये नवोन्मेष नेटवर्क स्थापन केलं जाणार असून हे वर्ष दोन्ही देशांमधलं नवोन्मेष वर्ष म्हणून ओळखलं जाणार आहे. दोन्ही नेत्यांनी मुंबईत त्याचं अनावरण केलं. संरक्षण क्षेत्रातल्या भागिदारी कराराचं नुतनीकरण, परस्परांच्या देशात लष्करी यंत्रणांची उभारणी, हॅमर क्षेपणास्त्राच्या निर्मितीसाठी भारत इलेक्ट्रॉनिक्स आणि फ्रान्सच्या सॅफ्रान कंपनीत करार यांचा यात समावेश आहे.

दुर्मिळ खनिज आणि धातूंच्या क्षेत्रात सहकार्य, स्टार्टअपच्या क्षेत्रात सहकार्य, दिल्लीतल्या एम्समध्ये आरोग्य क्षेत्रासाठीच्या एआय केंद्राची स्थापना, नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय आणि टपाल खात्याचा फ्रान्समधल्या संबंधित संस्थांशी सहकार्य करार यावरही दोन्ही देशांमध्ये सहमती झाली.

**<><><><><>**

तंत्रज्ञान हे मानवतेच्या कल्याणासाठी असून मानवाची जागा घेण्याची नसल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. खासगी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीमध्ये ते बोलत होते. सर्व जन हिताय सर्व जन सुखाय हे तंत्रज्ञानाचं अंतिम ध्येय असलं पाहिजे. मानवी क्षमतेचा अभूतपूर्व विस्तार करण्याची क्षमता AI मध्ये आहे.  मात्र तिला योग्य दिशा दिली नाही, तर सध्याच्या समाज व्यवस्थेला आव्हान निर्माण होऊ शकतं, असं ते म्हणाले. एआयच्या क्षेत्रात जगातल्या आघाडीच्या ३ देशांमध्ये भारताचा समावेश व्हावा हे स्वप्न असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात पुढच्या दोन वर्षांत २०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक अपेक्षित असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. नवी दिल्लीत भारत मंडपम इथे आयोजित एआय समिट दरम्यान घेतलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

**होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव**

एआयचा सर्वात मोठा धोका डीपफेक आशय असून ही समस्या मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. याचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसत असल्यामुळे त्यांना आणि समाजाला संरक्षण देण्यासाठी नियम अधिक कठोर करण्याची आवश्यकताही वैष्णव यांनी व्यक्त केली.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही डॉक्टर आणि वैद्यकीय तज्ञांची जागा घेईल ही भीती अनाठायी असल्याचं स्पष्टीकरण केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल यांनी आज सांगितलं. एआय इम्पॅक्ट समिटच्या एका सत्राला संबोधित करताना त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांनी एआय साक्षरतेला प्राधान्य देण्याचं आवाहन केलं.

एआय इम्पॅक्ट समिटच्या आजच्या दुसऱ्या दिवशी लोककेंद्रित कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तांत्रिक क्षमता यांच्या गरजेचं परीक्षण करण्यात आलं. या सत्राला इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांनी संबोधित केलं.  सर्जक अर्थव्यवस्थेतल्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात एआयमुळे सकारात्मक बदल झाल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू म्हणाले. आर्थिक कमतरतेमुळे कथांची मांडणी न करता येणारे अनेक आशय निर्माते आपल्या कथांना एआयच्या माध्यमातून जागतिक स्तरावर सांगू शकतात, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी सीबीआयकडे सोपवावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे.  राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळानं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची  वर्षा निवासस्थानी भेट घेतली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा शिष्टमंडळात समावेश होता. त्यावेळी ही मागणी केल्याचं आणि यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्रालयाशी ताबडतोब पत्रव्यवहार करण्यात येईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचं तटकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बारामतीजवळ महिन्यापूर्वी कोसळलेल्या लिअरजेट 45 विमानाच्या कॉकपीट वाईस रेकॉर्डरमधला डेटा मिळवण्यासाठी , रेकॉर्डरच्या निर्मात्या कंपनीकडून विशेष सहाय्य मागवलं असल्याचं विमान अपघात तपास कार्यालय **अर्थात A A I B नं**

म्हटलं आहे. या विमानातले दोन्ही  रेकॉर्डर दुर्घटनेपूर्वी बराच काळ तीव्र तापमानात राहिल्याचं A A I B ने म्हटलं आहे.

<><><><><>

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे अध्यक्ष तारीक रहमान यांनी आज बांगलादेशाच्या प्रधानमंत्रीपदाची शपथ घेतली. राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी त्यांना पदाची शपथ दिली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह अनेक देशांचे प्रतिनिधी या शपतग्रहण सोहळ्याला उपस्थित होते. त्याआधी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने रहमान यांची संसदीय पक्षाचे नेते म्हणून निवड केली. नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत २९७ पैकी २०९ जागा जिंकत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी बांगलादेशातला सर्वात मोठा पक्ष ठऱला आहे.

तारीक रहमान हे बांगलादेशाच्या माजी प्रधानमंत्री दिवंगत खालिदा झिया यांचे पुत्र आहेत. तब्बल सतरा वर्षं त्यांनी स्वतःवर निर्वासन लादून घेतलं होतं.

<><><><><>

पाकिस्तानात दहशतवादी गटाने स्फोटकं भरलेलं वाहन वापरुन केलेल्या आत्मघाती हल्ल्यात अकरा सुरक्षा कर्मचाऱ्यांचा तसंच एका बालकाचा मृत्यू झाला. या हल्ल्यात अन्य सातजण जखमी झाले. जखमींमध्ये महिला तसंच बालकांचा समावेश आहे.

<><><><><>

इराण आणि अमेरिकेदरम्यान चर्चेची दुसरी फेरी ओमानच्या मध्यस्थीने जिनिव्हा इथं सुरु आहे. इराणच्या अणुकार्यक्रमाला विरोध म्हणून अमेरिकेने लादलेल्या आर्थिक निर्बंधाविषयी या बैठकीत चर्चा होत आहे.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत ब गटात आयर्लंड आणि झिंबाब्वे यांच्यात आज श्रीलंकेत पल्लिकेले इथं होणारा सामना रद्द झाला. त्यामुळं झिम्बॉम्वे सुपर आठ मध्ये पोहोचला आणि ऑस्ट्रेलिया स्पर्धेबाहेर गेला.

क गटात मुंबईच्या वानखेडे स्टेडीयमवर स्कॉटलंड आणि नेपाळ यांच्यात सामना सुरु आहे. नेपाळनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

ड गटात चेन्नई इथं झालेल्या सामन्यात न्यूझीलंडनं कॅनडाला ८ गडी राखून पराभूत केलं. कॅनडानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत २० षटकात ४ गडी गमावून १७३ धावा केल्या. न्यूझीलंडनं फक्त २ गड्यांच्या मोबदल्यात १६ व्या षटकातच कॅनडाची धावसंख्या पार केली.

**//<><><><><>//**